# नवकथेच्या पर्वातील स्त्रीकथाकारांचे लेखन : प्रिया तेंडुलकर, गौरी देशपांडे

**राजेश्वरी राजू लव्हात्रे (सांगोळकर)**
संशोधिका

**डॉ. राकेश देवरावजी कभे**
मार्गदर्शक
मराठी विभागप्रमुख महात्मा गांधी महाविद्यालय, पारशिवनी

---

**गोषवारा :**

*महाराष्ट्रातील स्त्रियांच्या हक्कांसाठीची जागृती ही फार पूर्वीपासून होत असली, तरी त्यांना सामाजिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी संघर्ष करावा लागला. प्राचीन काळातील विविध स्त्री व्यक्ति आणि ऐतिहासिक घटनांमुळे स्त्रियांची स्थिति कशी होती, हे स्पष्ट होते. भारतीय समाजात धर्म, जात, वर्णव्यवस्था यामुळे स्त्रियांवर अनेक बंधने होती.सतीप्रथा, बालविवाह, विधवांचे प्रश्न, पुनर्विवाह यांसारख्या अनेक समस्या होत्या .या समस्याविरूद्ध लढा देणाऱ्या व समाजपरिवर्तनातसाठी महात्मा फुले आणि सावित्रीबाई फुले यांचे योगदान फार महत्त्वाचे आहे.पुढे डॉ. आंबेडकरांनीही स्त्री-प्रश्नांना महत्त्व दिले.स्वातंत्र्यानंतर समाजातील अनेक प्रश्नांना चळवळी झाल्या. १९६० नंतर बेरोजगार, अत्याचार यांसारख्या नव्या समस्यांमुळे सामाजिक चळवळींना अधिक चालना मिळाली. १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला दशक जाहीर झाल्याने स्त्री- मुक्ति चळवळींना वेग आला.या समाजाच्या बदलत्या प्रवाहात स्त्रीयांचे प्रश्न केंद्रस्थानी आल्या. नवप्रवाहाच्या कालखंडात अनेक स्त्रियांनी कथालेखन केलेले आढळून येतात.गौरी देशपांडे आपल्या कथेतून स्त्री जाणिवांचा, त्यांच्या बंदिस्त मनोवृत्तीचा आणि पुरुषी स्वातंत्र्याचा, लंपटपणाचा, मुक्ततेचा विचारचे चित्रण दिसुन येतात. स्त्री जीवनाच्या व्यथा, वेदना, वैफल्य, पराभूतता, एकाकीपणा यासर्वांची प्रचीती प्रिया तेंडूलकर यांच्या कथासंग्रातून दिसून येते.*

**बीजशब्द** : स्त्रीवाद, स्वातंत्र्य,नवकथा, संघर्ष, ओळख, स्वतःचा शोध, संवेदनशील, समाज परिवर्तन, प्रतिबिंब, आत्मभान, अभिव्यक्ती.

---

**प्रस्तावना:**

१९६० नंतर स्त्रियांच्या साहित्यातील बदलाच्या दिशा स्पष्ट होऊ लागल्या मराठी साहित्याच्या प्रवाहात स्त्रीकथाकारांचे योगदान अत्यंत महत्तवाचे आणि प्रभावी आहे. १९४५ नंतर होऊ घातलेल्या साहित्यिक बदल १९६० नंतर साहिती क्षेत्रात सर्वसामान्य झालेला दिसून येते.१९६० नंतर अनेक स्त्रियांनी नव्या मूल्यांचा, जाणिवांचा स्वीकार करून आपल्या प्रकृतीधर्मानुसार लिहित्या झाल्या. वैचारिक लेखन ,कथा, कादंबरी, कविता आणि आत्मचरित्राच्या क्षेत्रात स्त्रियांनी आपली नाममुद्रा उमटविली. १९६० ते २०११ या पन्नास वर्षाच्या कालखंडात स्त्रियांच्या साहित्यात बदल होत गेला. या बदलांचा मागोवा घेत असताना पारंपरिक साहित्य निर्मितीचे मूल्ये आणि स्त्रीवाद नव्या जाणिवेची मूल्ये यांचा संघर्ष स्त्रियांच्या साहित्यात उमटलेला दिसतो.

लेखिकाणी जडणघडण पुरुसत्ताक व्यवस्थेच्या परिप्रेक्ष्यात झालेली असते. व्यवस्थेचे संस्कार लेखिकांच्या मनावरही घट्ट असतात. आणि त्यांचे प्रतिबिंब साहित्यात उमटत असते.त्यामुळे नव्या जाणिवा पचवून त्यांची अभिव्यक्ती करणे वाटते तेवढी सोपी बाबा नाही.. १९७५ नंतर लेखन करणाऱ्या लेखिकांच्या साहित्यातून काही स्त्रीवादी मूल्ये प्रखरपणे समोर आलेली दिसतात. गौरी देशपांडे , मेघना पेठे सानिया, प्रिया तेंडुलकर, कविता महाजन यासारख्या लेखिकांच्या कथा हा दृष्टीकोन काही प्रमाणात प्रकट झालेली दिसते. पण मुद्दाम तरवून या लेखिकांनी हे लेखन स्त्रीवादी दृष्टीकोन अंगीकारून केले. असे म्हणणे योग्य ठरणार नाही, तर माणूस म्हणून जगतांना समाजाने लादलेले बाई म्हणून जगण्याची मूल्ये नाकारून जो नवा अवकाश समोर आला तो या लेखिकांनी आपल्या कथा सा हित्यातून प्रकाशने मांडलेला दिसून येते.

**विषय विवेचन :**

आधुनिक काळात समाज परिवर्तनाचे होत आहेत. झपाट्याने होणाऱ्या सामाजिक परिवर्तनात जीवनमूल्य जीवनसरणी ही झपाट्याने बदलते आहे. ही बदलेली जीवनसरणी आपल्या कथेतून स्त्रीकथा लेखिकेनी रेखाटलेली आहे० स्त्रियांच्या समस्याच्या प्रश्नाचा शोध लेखिकांनी आपल्या लेखणीतून केलेली आले. स्त्रियाच्या अस्तिवांचे भान ठेवणाऱ्या लेखिकाचे स्त्रीलेखन खालील कथेतून रेखाटलेले आहे.

**प्रिया तेंडुलकर यांचे स्त्रीकथा लेखन:**

प्रिया तेंडुलकर १९८० या काळातल्या एक अत्यंत धाडसी स्त्रीवादी जाणिवा घेऊन लेखन करणाऱ्या लेखिका आहेत. यांच्या कथेतील स्त्रिया भावनिक व वैचारिकदृष्ट्या अधिक प्रगल्भ वाटतात .त्या जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचा शोध घेणाऱ्या दिसून येतात. मैत्री, प्रेम, लग्न या प्रवासातल्या प्रत्येक टप्प्यावरच्या प्रश्नांनी त्यांच्या नायिका झगडा देतात.स्वत:चे स्वतत्व टिकवण्याचा ध्यास त्यांच्याझागड्या मागे असतो. स्वत:ची अस्मिता जिवंत ठेवण्याची तीव्र इच्छा, आंधळा पुरुषी अहंकार, एकाकीपणा हे सारेच मोठ्या ताकदीने झेलणाऱ्या त्यांच्या स्त्रीप्रतिमा आहेत. स्वत:चे करियर, घर, नाती या विविध पातळयांनवरील समतोल साधताना त्या स्वत:चे स्वतत्त्व जपण्याची तीव्र इच्छा बाळगतात’ बदल्या नातेसंबंधाचे व त्यातील ताण- तणावांचे चित्र अधिक प्रत्ययकारक आहे.

प्रिया तेंडुलकर यांनी घटस्फोटाचा प्रश्न आधुनिक जाणिवांनी हाताळलेला आहे. उदाहरणार्थ ,’नवा गडी’ ही कथा (‘ज्याचा त्याचा प्रश्न’ : १९८६) या कथेतील मानू हिचा एका मुसलमान माणसासोबत आंतरधर्मीय विवाह झालेला असते.असिफ हा मानूचा भूतकाळ असतो. आसिफचा वंशाचा दिवा दीपकच्या रूपात वर्तमानात सोबत असतो. मनू ची कर्मधर्मसंयोगात घटस्फोटात सुरेशशी भेट झाली. त्याच्याकडून सुरेशचा लग्नाचा प्रस्ताव आला परंतु लग्नापूर्वी जातीधर्माच्या चौकटीतली बंदिवान माणसे अनुभवला मिळतात. त्यामुळे तिला सुरेश कडून व्यावहारिक सुरक्षितता नाकारण्यात आपली समजुती वाटली. मुसलमानालाही आपल्यासारखे दोन हात, दोन पाय आणि एक डोक असते. तो ही आपल्यासारखा एक माणूस असते.आपल्या डोक्यासारखे कुजके, किडलेले विचार त्यांचे पण असतात. लग्न न होण्याचे कारण मुसलमान होण्याचा नाही . ही विचारप्रक्रिया आजच्या आधुनिक मूल्यदृष्टीचीच निदर्शक आहे .वास्तविक सुरेश ज्या परिस्थितीत मनू चा स्वीकार करयेचा होता ती परिस्थिति

त्याला मानसिक किंमत मोजणारी होती. एका वाढत्या वयाच्या घटस्फोट सून, मुसलमानाचा नाव असलेला मुलगा, एक शिळी, वापरलेली दुसऱ्याला नकोशी असलेली बायको आणि दुसऱ्या पुरुषाच नाव लावणारा, त्याला अंकल म्हणारा, त्याच्या बायकोवर हक्क गाजविणाऱ्या नात्याला शक्ति करणे तो त्याला आपला अधिकार नाही आसे वाटत होते. ही मनूची मनोगते सुरेशविषयी आस्था निर्माण करणारी आहेत. परंतु मनू हि आर्थिक दृष्ट्या स्वावलंबी होती तिनि मुलाची पोटगी मागितलेली नव्हती. ती स्वत:च्या पायावर जगणारी स्त्री स्वची जाणीव ठेवणारी होती.घटस्फोतिटांचा प्रश्न करुणा भावनेने हाताळण्यापेक्षा अस्मिताधर्माने हाताळण्याची ही समकालीन कथा  लेखिकांची भूमिका निश्चित नवी व स्त्रीनिष्ठ आहे.

'ज्याचा त्याचा प्रश्न' या कथांसंग्रातून सांकेतिक वैवाहिक जीवनाच्या प्रस्थापित साच्यांचा आणि जीवनविषयक मूलभूत प्रश्नांचा त्या शोध घेताना दिसतात. त्यातून त्यांची भावनिक व वैचारिक प्रगल्भता दिसून येते. ते कोणत्याही स्त्रीमुक्तीवादी चळवळीच्या प्रसारासाठी निर्माण झालेले नाही. त्यांच्या कथा दुःखे शोधित जातात. मध्यम, उच्च मध्यमवर्गीय तरुण स्त्रीचे दुःख हा त्यांच्या कथांचा केंद्रबिंदू आहे. या स्त्रियांच्या आयुष्यातली मैत्री, प्रेम, लग्न, लग्नानंतरही स्वत्व जोपासण्याची तीव्र इच्छा, आंधळा पुरुषी अहंकार, त्याविरुद्धचा लढा आणि शेवटी एकाकी बाहेर पडणे, स्वतःच्या कॅरिअरचा प्रश्न, पुरुषाविना वाटणारी असुरक्षितता, घटस्फोटानंतर परत घरी आल्यावर आई-वडिल, भाऊ यांच्या बदललेल्या भूमिका यातून निर्माण होणारा संघर्ष, दु:ख यांचे दर्शन त्यांच्या कथातून घडते. हे दुःख आपल्याला अस्वस्थ करते पण एका मर्यादे पर्यंत. त्यातून नियतीचा प्रश्न उपस्थित होत नाही. उच्चमध्यमवर्गातील, एका बाजूने कौटुंबिक जबाबदाऱ्या असणाऱ्या आणि दुसरीकडे आत्मबळावर एअर होस्टेस,जाहिरात संस्था यातून परिश्रमाने, स्वतःच्या कर्तृत्वाने स्थिरावलेल्या स्त्रिया त्यांनी रंगविलेल्या आहेत. त्याबरोबरच स्त्री-पुरुष संबंधातील नितळ मैत्रीचे हृद्य चित्रण त्या 'सुंदरचे दिवस' या कथेत करताना आढळतात. त्यात खोटी काव्यात्मकता नाही तर मानवी नाते संबंधातली एक तरल दृष्टी त्यात व्यक्त होताना दिसते.स्त्रियांच्या संदर्भातील  वडील, भाऊ, पती, मित्र यांचे वर्तन आणि त्यामुळे होणारा स्त्रीच्या व्यक्तित्वाचा संकोच, त्यामुळे तिच्या आयुष्यात येणारी अनपेक्षित वळणे याचा वेद प्रिया तेंडुलकर आपल्या कथातून घेतात.

**गौरी देशपांडे यांचे स्त्रीलेखन :**

गौरी देशपांडे या स्त्रीवादी कथा लेखिकांमधील सर्वात बंडखोर कथालेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. स्त्री-स्वातंत्र्याच्या प्रश्नाच्या अनेक बाजू धीटपणाने त्यांच्या कथांतून आविष्कृत झालेल्या आहेत. याचे कारण त्यांच्या व्यक्तिमत्वाची झालेली वैशिष्ट्यपूर्ण जडणघडण. प्रसिद्ध समाजशास्त्र कै. इरावती कर्वे यांची कन्या म्हणून त्या ज्या घरात वाढल्या त्या घराचे वातावरण स्वतंत्र स्त्रीच्या वाढीसाठी पोशाक होते. मुलींना लहानपणापासून आई, आजी, मावशी, मामी, काकी, आत्या अशा व्यक्तिकडून तिच्यावरील निर्बंधाची जाणीव करून दिली जाते. उदाहरणार्थ : मुलीच्या जातीने मोठयाने बोलू नये,भूक लागली असली तरी हात राखून खावे, जपून पाय टाकणे इत्यादी. परंतु गौरीबाईला एक मुलगी म्हणून या जुन्या परंपरा पाळाव्या लागल्या नाही. त्यांच्या घरातील संस्कारामुळे एक 'मुलगी' म्हणून वाढ होण्यापेक्षा एक 'व्यक्ति' म्हणून वाढ होणे महत्त्वाचे वाटले. त्यामुळे पुरुषप्रधान संस्कृतीतल्या बंधनांच्या चाकोरीतून वाढलेल्या कोणत्याही स्त्री लेखिकेपेक्षा गौरी देशपांडे यांच्या

कथालेखानचे आशयविश्व वेगळे आहे. मुक्त स्त्रीच्या नाना छटा त्यांच्या कथांतून दिसतात.

'आहे हे असं आहे' या संग्रहातील 'सोन्याचा तुकडा' या कथेतील नायिका पुरुषांच्या तालावर नाचणारी नाही, पुरुषाच्या वर्चस्वापासून ती स्वतंत्र विचाराची आहे. या कथेत पुरुष हा लाडीगोडी लावणारा आहे. तरी त्या लाळधोपटेपणाचा उपहास करते.

'उद्धालक ऋषिची बायको' या कथेतील कमला हिची व्यक्तिरेखा अशीच आहे. हिच्या स्वभावत दुसऱ्याने 'नाही' म्हटले तर ती हट्टाने करून दाखवणारी आहे. कमलाने सिल्विशी लग्न का केले ? या प्रश्नाचे उत्तर अम्माने 'नाही' म्हटले म्हणून असे असते; आणि केवळ त्याच्यामुले ती आंतरजातीय, आंतरधर्मीय विवाह करते. कमला च्या वडीलाला नापसंत असतो कारण तो वेसनाच्या आहारी गेलेला, गाईचे मास खाणारा, असतो म्हणून. सिल्वि नापसंत होता.

एक रोकडा विचार मांडणाऱ्या, कौटुंबिक परंपरांचे पुर्नमूल्यमापन करणाऱ्या, सुबोध आकर्षक भाषाशैली अवगत असणाऱ्या नव्या पिढीशी सत्यवचनी, निर्भयपणे हितगुज करणाऱ्या,परंपरागत चौकटीबाहेर जाऊन, अपूर्व आणि आगळ्यावेगळ्या प्रकारचे लेखन करणाऱ्या होत्या. त्यांचे आयुष्यही असामान्य होते आणि ते तीन खंडांमध्ये विस्तारलेले होते.जाणत्या वाचकांच्या लेखी त्यांच्याभोवती कौटुंबिक कर्तुत्वाचे एक वलय आहे. त्यांनी चित्रित स्त्रीप्रतिमा मध्यमवर्गातील जन्मलेली स्त्री उच्चमध्यमवर्गातील वर्तुळात वावरते आहे. आधुनिकतेशी सुसंगत अशी विचारसारणी, कार्यपद्धती आणि जीवनशैली आपल्या कथेतून चित्रण करते. उद्योगप्रधान प्रणालीतील महत्त्वाच्या असलेल्या स्वावलंबन, कार्यक्षमता, स्पर्धात्मक, नवोक्रम आणि वेगवान बदलांना गौरी देशपांडे आपल्या कथेतून व्यक्त करतात. प्रत्येक स्त्रीला स्वत:च्या आयुष्याचा प्रत्येक निर्णय घेण्याचा अधिकार आहे. लैंगिक व्यवहारातील समाजमान्यता म्हणजे नैतिकता हे समीकरण मान्य करत नाही. 'राईट ऑन मिस्टर' या कथेत असे दिसते की मध्यमवर्गीय, भारतीय संकुचित स्त्रीजीवनाच्या कल्पना आता फार काळ टिकणाऱ्या नाहीत. काळ बदलतो आहे आणि हा बदल घराच्या उंबरठ्यापर्यंत येऊन पोहचला आहे. कुटुंबातली नाती ही व्यक्तिजीवनावरची ओझी बनतात. या नात्यांना भूमिका, अपेक्षा चिकटतात. त्यापेक्षा 'मैत्री' हे नाते मिळालेले नसून निवडलेले असते. त्याचे मोल अधिक आहे. हे दाखवणारी अनेक पात्रे गौरी देशपांडे यांच्या कथात वावरतात.शरीर व शरीरपासून मिळणारे सुख याची जाणीव व्यक्त करताना त्यांच्या नायिका संकोचत नाहीत. शारीरिक तृप्ति हा फक्त पुरुषांचाच हक्क नाही. स्त्रीचाही तो आहे. आधुनिक स्त्री ही याबाबतीत अधिक मोकळी आणि स्पष्ट झाली आहे. हे संबंध दोघांनाही सारखेच सुखदायी वाटले पाहिजेत. गौरी देशपांडे यांच्या कथांतून आढळणारी स्त्री कोठेही निराश, हताश, नियतीशरण वाटत नाही. विवाहबाह्य संबंधाचा अनुभवही त्यांच्या नायिका असांकेतिक पद्धतीने घेताना दिसतात. चोरटेपणा अनैतिकतेच्या जाणीवेतून येणारी पापभावना त्यांच्या मनात शिरत नाही. पुरुषप्रधान व्यवस्थेचे घट्ट कवच फोडून स्वतःला व्यक्ती म्हणून प्रतिष्ठा देण्याचा प्रयत्न करण्यासाठी स्त्रीला फार मोठा लढा द्यावा लागतो. या लढ्याच्या खुणा गौरी देशपांडे यांच्या कथात आढळत नाहीत. त्यांच्या स्त्रिया ज्याप्रकारच्या घरात वाढतात तेथे हे लढे अपेक्षित असत नाहीत. एकप्रकारे ही एक त्यांच्या कथांची मर्यादा आहे. 'आहे हे असं आहे' हे त्यांच्या एका कथासंग्रहाचे नाव प्रतिनिधिक आहे. आधुनिक स्त्रीच्या जगण्याचे त्रिविध अनुभव टिपणाऱ्या गौरी देशपांडे या एका अत्यंत महत्त्वाच्या कथालेखिका आहेत.

**निष्कर्ष :**

स्त्रियांचे अबलापण, पुरूषसत्ताक संस्कृतीतील तिचे दुय्यम स्थान हेच तिच्या अपमानाचे कारण असल्याचा निष्कर्ष या कथांतून पुढे येतो. वैधव्य,घटस्फोटासारख्या आपत्तींकडे बघण्याचा पारंपरिक सहानुभूतीचा दृष्टिकोण जाऊन अशा प्रसंगांतही स्त्रियांनी आत्मजाणिवांशी प्रामाणिक राहून तोंड दिले पाहिजेअशी नवी संघर्षशील जाणीव या कथांमधून प्रकट झालेली दिसते.

लग्नसंस्थेची चौकट अधिक लवचिक झाल्याची जाणीव ह्या कथांमधून प्रकर्षाने होते. गौरी देशपांडे, सानिया यांच्या कथांमध्ये हे नवे वळण प्रामुख्याने दिसते. पुरुषसत्ताक समाजरचनेतील पुरुषांच्या स्थानाला गौणभाव प्रदान करून स्त्रियांना मुक्त आचारणाचे स्वातंत्र्य देणाऱ्या कथा गौरी देशपांडे यांनी काहीशा आक्रमक आणि मनमोकळ्या शैलीत लिहिल्या आहेत. स्त्रीमुक्ती आंदोलनाचे स्पष्ट पडसाद अशा कथांमधून दिसून येतात.

**संदर्भसूची:**


- 'मुक्तगौरी' डॉ.अमृते संध्या ,विजय प्रकाशन ,नागपुर प्रथम आवृत्ती- ऑगस्ट २०१३.
- 'स्वातंत्र्योत्तर मराठी साहित्याचा मागोवा', प्रदक्षिणा खंड दुसरा घबी रविंद्र, पुष्पा भावे, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती – १९९९.
- 'स्त्रीवाद' ,लांडे सुमती ,शब्दालय प्रकाशन, श्रीरामपूर, पहिली आवृत्ती- डिसेंबर २००७
- स्त्रीयांचे कथालेखन' , डॉ.वरखेडे मंगला ,साकेत प्रकाशन प्रा.लि., औरंगाबाद, दुसरी आवृत्ती – २००५.